# आंतरमहाविद्यालयीन लावणी नृत्य स्पर्धा

मराठी वाङ्मय मंडळातर्फे दिनांक २७ ऑगस्ट,२०१६ रोजी आंतरमहाविद्यालयीन लावणी नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

मुंबईतील अनेक महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी यात सहभाग घेतला होता.अटीतटीच्या या लावणीनृत्य स्पर्धेचे परीक्षण नृत्यप्रशिक्षक विद्यासागर कंबळे यांनी केले.या कार्यक्रमात शाहीर प्रवीण जाधव व सहकारी यांनी शाहिरी पोवाड्याच्या माध्यमातून सर्वांना उत्साहित केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान प्राचार्य डॉ एम्. एस्. कुऱ्हाडे यांनी भूषविले व कार्यक्रमाचे संचालन प्रा. संजय पाटील यांनी केले. सर्वच नृत्यांगणांनी आपल्या सुंदर नृत्याचे सादरीकरण केले. डोंबिवलीच्या के.व्ही.पेंढारकर महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी मानसी घनश्याम गवरे हिने प्रथम क्रमांक पटकावला.पटुकगला महाविद्यालयाची कृतिका तांदळेकर हिने द्वितीय तर डी. टी. एस.एस. महाविद्यालयाच्या उज्ज्वला भांगरे हिने तृतीय क्रमांक पटकावला.विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देण्यात आले.

